# कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ मर्या.कोल्हापूर

## गोकुळ प्रकल्प ः प्लॉट न.बी-१ एम.आय.डी.सी गोकुळ शिरगाव.

जा.नं./कोदूसं/संगणक / १४३३८ /२०२१-२२ दिनांक २१/०३/२०२२

## परिपत्रक

प्रति
चेअरमन/ सेक्रटरी श्री. सह.दूध व्याव.संस्था मर्या.

**विषय - संगणक व वजनकाटा सामुग्री दुरूस्ती देखभाल आणि वजनकाटा स्टॅम्पिंग सेवेबाबत.**

महोदय,

आपणांस कळविणेत येते की, दिनांक ०१/०४/२०२२ ते दि.३१/०३/२०२३ या कालावधीसाठी संस्थेकडे कार्यरत असलेल्या संगणक सामुग्री दुरूस्ती देखभाल तसेच वजनकाटा दुरूस्ती देखभाल व स्टॅम्पिंगसाठी संघामार्फत खालील दराने सेवा पूरवणेत येणार आहे.

अ) संगणक सामुग्रीचे एका संचास (संगणक,प्रिंटर, इंटरफेस युनिट व युपीएस) सर्व करासहीत वार्षिक दुरूस्ती व देखभाल दर रू.५३००/- (रूपये पाच हजार तीनशेहे फक्त) राहील.या सेवेसाठी संघामार्फत चार (४) अधिकृत ठेकेदारांची नियुक्ती करणेत आली आहे.

ब) वजनकाटा एका संचास प्रत्येक स्टॅम्पिंगसाठी रू.१३००/- (रूपये एक हजार तीनशेहे फक्त) व दुरूस्ती व देखभालीसाठी येणारा प्रत्यक्ष खर्च याप्रमाणे राहील.या सेवेसाठी संघामार्फत एका (१) अधिकृत ठेकेदाराची नियुक्ती करणेत आली आहे.

वरील दोन्ही ठेक्याबाबतचे नियम व अटी तसेच संघनियुक्त अधिकृत ठेकेदारांची यादी सोबत जोडली आहे. सदर योजनेत संस्थांचा सहभाग ऐच्छीक राहिल. दिनांक ०१/०४/२०२२ पासून या योजने मधील सहभागासाठी संस्थेने ठेकेदाराची नियुक्ती करून तसे संघास व संबधीत ठेकेदारास संस्थेचे लेटर हेडवर लेखी संमतीपत्राव्दारे कळविणे आवश्यक आहे. संमतीपत्राचा नमुना सोबत जोडला असून सदर संमतीपत्र संघाचे मुख्यालयाकडे व ठेकेदाराकडे पाठवून देणेची व्यवस्था करावी. याबाबतच्या अधिक माहितीसाठी संघाचे मुख्यालय संगणक विभागाशी संपर्क साधावा.

कळावे ,

आपला विश्वासू ,

योगेश गोडबोले
कार्यकारी संचालक

---

## नमुना संमतीपत्र

प्रति,
मा.कार्यकारी संचालकसो
कोल्हापूर जिल्हा सह.दुध उत्पादक संघ मर्या.कोल्हापूर.

**विषय - संगणक सामुग्री व वजनकाटा दुरूस्ती देखभाल आणि वजनकाटा स्टॅम्पिंग सेवेबाबत.**
संदर्भ - जा.नं./कोदूसं/संगणक /१४३३८/२०२१-२०२२ दिनांक २१/०३/२०२२ चे परिपत्रक

महोदय,

संघाचे संदर्भिय परिपत्रकास अनुसरून संघामार्फत निश्चित केलेल्या ठेकेदाराकडुन दुरूस्ती देखभाल सेवा घेणेस आमची संमती असून दिनांक ०१/०४/२०२२ ते दि.३१/०३/२०२३ या कालावधीसाठी आंम्ही खालील ठेकेदारांची नियुक्ती करीत असून दोन्ही ठेक्यावावतचे नियम व अटी आंम्हास मान्य आहेत.

| अ.नं. | संस्थेने निवडलेला सेवा प्रकार | निवडलेल्या ठेकेदार कंपनीचे नांव |
|---|---|---|
| १ | संगणक सेवा | |
| २ | वजनकाटा सेवा | |

कळावे आपला विश्वासू ,

दिनांक - / /२०२२ चेअरमन सेक्रेटरी

# कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ मर्या.कोल्हापूर

दि.०१/०४/२०२२ ते ३१/०३/२०२३ करीता संगणक वजनकाटा दुरूस्ती देखभाल व वजनकाटा स्टॅम्पिंग सेवा पुरविणाऱ्या संघनियुक्त ठेकेदारांची यादी

## संगणक सेवा पुरवणाऱ्या ठेकेदार कंपनीचे नांव व पत्ता

| | | | |
|---|---|---|---|
| १ | **मे.ग्लोबल कॉम्प्युटर्स**<br>प्लॉट नं.५ सर्व्हे.नं.१०३८/१ , ए वार्ड,<br>नवीन वाशी नाका ,राधानगरी रोड ,कोल्हापूर ४१६०१२<br>मोबाईल ९९२२५ ३८५३८/ ७०५८५ ३८५३८<br>संपर्क व्यक्ती – श्री.दिलावर पन्हाळकर / श्री अभिजीत<br>ई–मेल – dil7571@gmail.com | २ | **मे.बायनरी सोल्युशन्स**<br>स्टार टॉवर, ब्लॉक नं. ५ , दुसरा मजला,<br>पाच बंगल्या जवळ , शाहूपुरी ,कोल्हापूर ४१६००१<br>मोबाईल ९४२२४ २४६६७ / ९५२७६ ०९५००<br>संपर्क व्यक्ती – श्री.पी.के.खोत<br>ई–मेल – binarykop@gmail.com |
| ३ | **मे.युनायटेड सिस्टम्स**<br>मु.पो.नेबापूर, ता.पन्हाळा जि.कोल्हापूर ४१६२०१<br>मोबाईल ९८५०१ ४८९१७ / ७६२०९ १००२९<br>संपर्क व्यक्ती – श्री दगडू पाटील<br>ई–मेल – dspnebapur1314@gmail.com | ४ | **मे.युनायटेड सेल्स ॲन्ड सर्व्हीसेस**<br>मु.पो.खुपिरे ता.करवीर, जि.कोल्हापूर ४१६२०५<br>मोबाईल ९८९०३ ५८१६२ / ७६९६७ १६५०७<br>संपर्क व्यक्ती – श्री अनिल पाटील<br>ई–मेल – anilpatil6507@gmail.com |

## वजनकाटा सेवा पुरवणाऱ्या ठेकेदार कंपनीचे नांव व पत्ता

| | |
|---|---|
| १ | **मे.युनिर्व्हसल इलेक्ट्रॉनिक वेईंग स्केल**<br>मु.पो. चिखली ,ता.कागल, जि.कोल्हापूर<br><br>**स्थानिक पत्ता** – ३४३१ यादववाडी, उचगाव ता.करवीर<br>जि.कोल्हापूर<br><br>मोबाईल ९४२३२ ७९७९३ / ९५७९५ ९५२५२<br>९७६५४ ६५५८९ / ९९२३० ९०६८७<br>९९२३०९०६८७<br>संपर्क व्यक्ती – श्री.अभिजीत वडगुळे/ श्री संतोश बेंद्रे/ श्री विनायक<br>ई–मेल – universalscale@gmail.com |

### ठेकयाचे नियम व अटी खालील प्रमाणे.

**<u>संगणक सामुग्री व वजनकाटा दुरूस्ती देखभाल ठेक्यासंबंधीचे नियम व अटी पुढीलप्रमाणे</u>**

१. ठेक्याचा कालावधी दि.०१/०४/२०२२ ते ३१/०३/२०२३ असा राहिल व सदर योजनेत संस्थांचा सहभाग ऐच्छीक राहिल.

२. संगणक सेवा ( संगणक सामुग्री, इंटरफेस युनिट, प्रिंटर, युपीएस, दुरूस्ती देखभाल) वार्षिक दर रूपये ५३००/– व वजनकाटा एका संचास प्रत्येक स्टॅम्पिंगसाठी रू.१३००/–(रूपये एक हजार तीनशेहे फक्त) व दुरूस्ती व देखभालासाठी येणारा प्रत्यक्ष खर्च या दराप्रमाणे निश्चित केली आहे.

३. संस्थेने संगणक सेवेसाठी प्रत्येक तिमाहीचे सुरवातीस, तिमाहीचे शेवटचे तारखेचा चेक रू १३२५/– व वजनकाटयाचे प्रत्येक स्टॅपिंग साठीची रक्कम रू १३००/– स्टॅपिंग पूर्ण केलेनंतर व वजनकाटा दुरूस्ती देखभालीसाठी येणारा प्रत्यक्ष खर्च ठेकेदारास आदा करणेचा आहे.या व्यतीरीक्त ठेकेदाराशी आर्थिक व्यवहार करणेचा नाही.

४. संगणक ठेका प्रिंटर हेड रिबन कार्टरेज़ यु.पी.एस बॅटरी वगळुन वाकी सर्व स्पेअरपार्ट साठी देणेत आला आहे. कोणत्याही कारणाने रिपेअरी न होणारे स्पेअरपार्ट ठेकेदार बदलून देईल. बदललेल्या पार्टची क्षमता व मेक हे वापरातील पार्ट इतकी अथवा जादाची असेल.

५. संस्थेने संपर्क साधलेपासुन २४ तासामध्ये ठेकेदार मशिन/पार्ट दुरूस्त करून देईल. एखादा पार्ट/मशिन २४ तासात दुरूस्त न झालेस पर्यायी पार्ट/मशिनची व्यवस्था ठेकेदार करून देईल. मशिन/पार्ट दुरूस्तीसाठी ने आण करणेची जवाबदारी खर्चासह ठेकेदाराची आहे.

६. संगणक ठेकेदार प्रतिबंधात्मक देखभालीसाठी दुरूस्ती व्यतिरिक्त तीन महिन्यातून एकदा सामुग्रीची तपासणी स्वच्छता करणेसाठी संस्थेस भेट देईल.

७. संगणकास व्हायरस इन्फेक्शन झालेस ठेकेदारामार्फत व्हायरस काढून देणेत येईल. व्हायरसमुळे संगणकावरील संस्थेचा डेटा/माहीती गेलेस त्याची जबाबदारी संस्थेची राहील.

८. उपकरणाचे फिजीकल डॅमेज, पाणी, दूध पडून होणारे नुकसान/ कमी-जास्त व्होल्टेज मुळे झालेले नुकसान/वीज पडणे/ योग्य आर्थिंग नसल्याने होणारे नुकसान यासाठी ठेकेदार जबाबदार रहाणार नाही.

९. संघाकडुन राबवणेत येत असलेल्या दुरूस्ती देखभाल सेवेत समाविष्ट झालेल्या संस्थांना ठेकदारांमार्फत फक्त संघाचे कॉमन सॉफ्टवेअरसाठीची सेवा देणेत येईल.

१०. स्विकारलेल्या ठेकेदाराकडुन समाधानकारक सेवा संस्थेस मिळत नसलेस तीन महिने संपल्यावर ठेकेदार बदलणेची मुभा संस्थेस राहील ठेकेदार बदलणेपूर्वी संस्थेने जबाबदारीने ठेकेदाराकडील येणी/देणी पूर्ण करणेची आहेत.

११. संघाने ठरवून दिलेल्या नियम व अटिनुसार ठेक्याची अंमलबजावणी करणेची जबाबदारी संस्थेची रहाणार आहे.

## <u>वजनकाटया संबंधित नियम व अटी</u>

१. संस्थेने स्टॅम्पिंगसाठी वजनकाटा ठेकेदाराकडे देताना खालील बाबींची पूर्तता करावी.
अ) मागील वेळेचे पडताळणी प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत. ब) वजनकाटा नविन असलेस परवानाधारक विकेत्याकडुन वजनकाटा खरेदीचे बिलाची झेरॉक्स प्रत. वजनकाटा व कागदपत्रे ठेकेदाराकडे देताना लेखी नोंद करून सुपूर्द करणेची आहेत व स्टॅम्पिंग पुर्ण करून आवश्यक नोंदी व प्रमाणपत्र ठेकेदराकडून घेणेचे आहे. पडताळणी पत्रकाची झेरॉक्स प्रत नेहमी वजनकाटयापाशी ठेवावी.

२. संस्थेकडून आवश्यक कागदपत्रांची पुर्तता झालेनंतर वेळेत स्टॅम्पिंग करून घेणेची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

३. ठेकेदाराकडून वेळेत स्टॅम्पिंग होणेसाठी ठेकेदारास योग्य ते सहकार्य व याबाबतचा आवश्यक तो पाठपुरावा संस्थेने करणेचा आहे.

४. आवश्यक कागदपत्रांची पूर्तता वेळेत न झालेमुळे स्टॅम्पिंग करणेस विलंब झालेस लागू होणारे विलंब शुल्क संस्थेने भरणेचे आहे.

५. संस्थेचे मागील सालातले स्टॅम्पिंग प्रलंबित/दंडात असलेस स्टॅम्पिंग नियमित करून घेणेसाठी ठेकेदार संस्थेस सहकार्य करेल. प्रलंबित स्टॅम्पिंग साठी येणारा खर्च संस्थेने सोसणेचा आहे.

६. नियंत्रक वैध मापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य यांचे परिपत्रकानुसार इलेक्ट्रॉनीक डिजीटल स्वरूपातील तोलन मापन उपकरणांस(वजनकाटयास) पडताळणी व मुंद्रांकन करताना सिल करणेचे आदेश देणेत आले आहेत जेणेकरून सिल तोडल्याशिवाय उपकरणामध्ये कोणत्याही प्रकारे फेरबदल करता येणे शक्य होणार नाही. सबब एकदा स्टॅपिंग झालेनंतर उपकरणामध्ये कोणत्याही कारणाने बदल करावयाची आवश्यकता निर्माण झालेस प्रत्येक वेळी पुन्हा नव्याने स्टॅपिंग करून घ्यावे लागणार आहे.

७. कोणत्याही कारणाने वजनकाटयामध्ये दुरूस्ती करावी लागलेस त्यासाठी ठेकेदार मदत करेल व दुरूस्तीसाठी येणारा प्रत्यक्ष खर्च संस्थेने ठेकेदारास काम पूर्ण झालेनंतर द्यावयाचा आहे.

## <u>संस्थेने घ्यावयाची खबरदारी</u>

८. ठेकेदाराने पाठवलेल्या प्रतिनिधीकडे ओळखपत्राची(आय कार्ड) विचारणा करूनच संस्थेने दुरूस्ती व देखभाल करणेस परवानगी द्यावी.

९. संस्थेने संगणक सामुग्री व वजनकाटयाचे दुरूस्ती व देखभालीबाबत नेमणुक झालेल्या ठेकेदाराशी संपर्क साधणेचा आहे. ठेकेदाराचे भेटीवेळी संस्थेचा जबाबदार प्रतिनिधी उपस्थित असावा. ठेकेदाराचे प्रत्येक भेटीवेळी संस्थेने कामाचे रिपोर्टची एक प्रत संस्थेत जपून ठेवणेची आहे. रिपोर्टवरती संस्था प्रतिनिधीचे नांव, सही, दिनांक ,वेळ शिक्क्यासोबत नमुद करणेचे आहे. कॉल रिपोर्ट दोन प्रतीत असणार आहे पैकी एक प्रत संस्थेस व एक ठेकेदाराकडे असणार आहे. ठेकेदाराचे प्रत्येक भेटीवेळी एकाच रिपोर्ट वरती तारीख घालून सही शिक्का देणेचा आहे.

१०. संघामार्फत निश्चीत केलेल्या दराव्यतिरिक्त संस्थेने ठेकेदाराशी आर्थिक व्यवहार करणेचा नाही.

११. संगणकास व्हायरस इन्फेक्शन होणार नाही याची काळजी संस्थेने घेणेची आहे. संगणकावरील कामकाजाचा आवश्यक बॅकअप नियमित घेणेची जबाबदारी संस्थेची राहील.

१२. संस्थेने संगणक केबीन व भोवतालचा परिसर स्वच्छ ठेवावा. मुख्य इलेक्ट्रीक सप्लाय़ आर्थिंग मध्ये काही दोष आढळल्यास त्याची काळजी संस्थेने घेणेची आहे. पाल़ उंदिर इ.मुळे उपकरणास नुकसान झालेस ठेकेदार जबाबदार राहणार नाही.

१३. संगणक व वजनकाटा सामुग्रीचे विद्युत धोक्यापासुनचे सुरक्षिततेसाठी संस्थेने युपीएसचा वापर करणे आवश्यक आहे. युपीएसचे वापरा शिवाय उपकरणाचे नुकसान झालेस त्यास संस्था जबाबदार राहील.

१४. संघाचे सॉफ्टवेअर वापरणेसाठी संस्थेकडे किमान डयुअल कोअर संगणक, २४ पिन १३२ कॉलम डॉटमॅट्रीक्स प्रिंटर, १ जीबी मेमरी, विंडोज एक्सपी चालु शकेल असा किंवा त्यापेक्षा जास्त क्षमतेचा संगणक असणे आवश्यक आहे. संगणकावरील ऑपरेटिंग सिस्टीमची अधिकृत आवृत्ती (लायसन्स) संस्थेने घेणे गरजेचे आहे. याबाबत काही तपासणी झालेस त्यास संस्था जबाबदार राहील.

१५. संस्थेकडील माहीती/डेटा भरणेचे काम संस्थेने स्वतः करणेचे आहे.

समाप्त